**नियमीत दिवाणी दावा क्र २०८/२०२३**
**संजय वि भिमराव**
**निशाणी क्र ८७**

**<u>प्रतिवादीचा शपथेवर उलटतपास सुरु वादीतर्फे वकील, श्री साठे</u>**

**१.** मी दहावी नापास आहे. वादमिळकतीचा उतारा आणि नकाशा मी पाहिलेला आहे. वादमिळकतीचे क्षेत्र ३९.२ चौरस मीटर आहे. वादमिळकतीच्या उताऱ्यावर महाराष्ट्र शासनाचे नावाला कंस झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे महाराष्ट्र शासनाचा वादमिळकतीशी संबंध राहिलेला नाही. वादमिळकतीच्या दक्षिणेस माझी मिळकत आहे ज्याचा सिसनं १३५६ आहे. प्रतिवादी क्र १ व ३ माझे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीच्या उत्तरेस वादींची सिसनं १३५०, १३५१ ची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिसनं १३५०, १३५१ चे प्रवेशद्वार दक्षिण दिशेकडे तोंड करुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतमधून वादी सिसनं १३५०, १३५१ मध्ये जात होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आता प्रतिवादींनी नियमाप्रमाणे बांधकाम केलेले असल्याने वादमिळकतीमधून जाता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या बांधकामामुळे वादमिळकतीमधून जाता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीमधून जाण्या-येण्यासाठी प्रतिवादी देखील वापर करीत होते. वादमिळकतीची पुर्व-पश्चिम रुंदी अंदाजे ३३ फूट आणि उत्तर-दक्षिण लांबी सव्वा तीन फूट आहे. पूर्वीच्या काळी वादमिळकत वादी व प्रतिवादी यांच्या समाईक वहिवाटीमध्ये होती.

**२.** सन २०२१ मध्ये प्रतिवादींनी सिसनं १३५६ मध्ये बांधकाम सुरु केले. सिसनं १३५६ आणि १३५०, १३५१ दरम्यान वादमिळकत आहे. सिसनं १३५६ च्या उत्तरेस वादमिळकत असून देखील माझ्या शपथपत्रामध्ये सिसनं १३५६ च्या उत्तरेस वादी यांचे घर असल्याचे मी नमूद केले आहे कारण वादींनी अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये अतिक्रमण करुन वादीने बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करुन बांधकाम केलेले असल्याने मी शपथपत्रामध्ये लिहिले आहे की, सिसनं १३५६ च्या उत्तरेस वादींचे घर आहे.

**३.** बांधकामासाठी नगरपालिकेची परवानगी नाही. साक्षीदार स्वतःहून पुढे सांगतो की, सर्व मिळकतींना महाराष्ट्र शासनाचे नाव असल्याने नगरपालिकेने परवानगी देण्यास नकार दिला. मिळकतींवर महाराष्ट्र शासनाचे नाव असल्याने बांधकाम परवानगी देता येत नाही असे लेखी पत्र

नगरपालिकेने दिले होते परंतु सध्या ते पत्र प्रतिवादींकडे नाही. मी ते पत्र दाखल करण्यास तयार आहे. बांधकाम सुरु करण्यापूर्वी परवानगीसाठी नगरपालिकेकडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दावा दाखल झाल्यानंतर परवानगी मिळण्याकरीता प्रतिवादींनी नगरपालिकेकडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, नगरपालिकेने प्रतिवादींनी सुरु केलेले बांधकाम थांबविलेले आहे. बांधकाम थांबविण्यासाठी नगरपालिकेने नोटीस दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी प्रतिवादींच्या बांधकामाला हरकत अडथळा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, परवानगी नसताना केलेले बांधकाम अनधिकृत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोरनं ८/२०१८ चे कोणतीही कागदपत्रे मी प्रस्तुत दाव्यात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ मध्ये कोणतीही मोजणी झालेली नाही.

**४.** वादी क्र १ यास घरकूल योजने अंतर्गत घर मंजूर झालेली आहे. वादी क्र १ ने सिसनं १३५० मध्ये घरकूल योजने अंतर्गत घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व परवानगी घेतल्यानंतर वादी क्र १ ने घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी वादीच्या घराच्या बांधकामाला हरकत अडथळा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अनधिकृत बांधकाम करीत होतो आणि वादी त्या बांधकामाला हरकत घेतील अशी मला भिती असल्याने कोर्टामध्ये कॅव्हेट अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिदाव्याला कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या दाव्याला शह देण्याकरीता प्रतिवादींनी प्रतिदावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

JAIN AKHIL OMPRAKASH

Digitally signed by JAIN AKHIL OMPRAKASH
Date: 2025.04.03 16:34:23 +0530

(अखिल जैन)

दिनांक - ०३/०४/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.